ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें
वार्षिक वृत्तान्त सन १९४५-४६

लेखक : दत्तात्रेय गोपाळ फडके
सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

प्रकाशक : वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें

प्रकाशन वर्ष : १९४६

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

वेदोऽखिलो धर्ममूलम् ] श्री [ तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते ।

' धर्मो रक्षति रक्षितः '

( ता. ३०।४।१९२० रोजीं रजिस्टर झालेली. )

# वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें.

शके १८६७ सालचा

# वार्षिक वृत्तान्त

वर्ष ७१ वें.

सन १९४५-४६

2476

लेखक व प्रकाशक

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव,

रा. दत्तात्रेय गोपाळ फडके, बी. ए. एल्एल्. बी.

कार्यवाह, वेदशास्त्रोत्तेजक सभा, ७१५। अ. १ सदाशिव पेठ, पुणें.

292

अ/११०

मुद्रक

. सरदेशपांडे, आदर्श मुद्रणाळय,

३९५।५ सदाशिव, पुणें २.

७००-७-४६

श्रावण, शके १८६७ ] [ जुलै १९४६

वेदोऽखिलो धर्ममूलम् । ]　　　　श्री　　　　[ तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते

" धर्मो रक्षति रक्षित "

( ता. ३०-३-१९२० रोजीं रजिस्टर झालेली )

# वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें

( स्थापना शके १७९७ )

वर्ष ७०-७१ वें

# शके १८६७ सालचा वार्षिक वृत्तान्त

[ सन १९४५-४६ ]

ॐ

वागीशाद्याः सुमनसः सर्वार्थानामुपक्रमे ।
यं नत्वा कृतकृत्याः स्युस्तं नमामि गजाननम् ॥ २ ॥
यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् ।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम् ॥ २ ॥

( १ ) सांपत्तिक स्थितिः—वृत्तांत विषयक वर्षाचे आरंभींची शिल्लक ७३०९६-२-११, या वर्षीं व्याज वगैरे धरून जमा रुपये ७३०५-१५-७ व चालू खर्चाकरितां ४८९०-१५-११ नांवें पडले व अखेर शिल्लक ७५५११-२-७ राहिली.

( २ ) आश्रयदातेः—या वर्गातील संख्या वर्षारंभीं १४९ होती. ती पुढील चार गृहस्थांनीं या वर्षीं आश्रयदाते होण्याकरितां देणग्या दिल्यामुळें १५३ झाली.

( १ ) श्रौतरत्न दिगंबर वासुदेव नेनेशास्त्री, इंदूर १०१ रु. (२) रा. गोविंद रामचंद्र ओक, पुणें रु. ११५ ( ३ ) रा. केशव विनायक म्हसकर पुणें, रु. १००, ( २ ) रा. भास्कर मुरलीधर दाते, पुणें रु. ११५.

आश्रयदात्यांपैकीं श्रीमती राधाबाई, भ्र. कृष्णाजी नारायण भिडे, पुणें या दिवंगत झाल्यामुळें सभेस अत्यंत वाईट वाटत आहे.

( ३ ) **आजन्म सभासदः**—या वर्गांतील सभासदांची संख्या २१५ होतं ती चालू सालीं सात सभासद नवीन झाल्यामुळें २२२ संख्या झाली. यापैकं खालील सभासद दिवंगत झाले म्हणून वर्षाअखेर संख्या २१४ राहिली.

**नवे आजन्म सभासदः**—१ गणेश सिताराम कानिटकर, गणेशवाडी. २ रा. सा. यशवंत दत्तात्रय खोले, ३ मधुसूदन पुरुषोत्तम नानल, पुणें, ४ शंकः आत्माराम मोघे, ५ रामचंद्र मोरेश्वर भागवत, ६ गजानन शंकर ओक, ७ श्रौताचार्य धुंडिराज गणेश दीक्षित बापट.

**आजन्म सभासदांपैकीं मृत्यु**—(१) श्रीमंत हरीहरराव काशीनाथराव ऊर्फ नानासाहेब खाजगीवाले, ( २ ) कृष्णाजी रावजी साठे, ( ३ ) चिंतामण गोपाळ परांजपे, ( ४ ) दामोदर केशव ओक. ( ५ ) गणेश सदाशिव मराठे, ( ६ ) कृष्णाजी विठ्ठल फाटक, ( ७ ) गोपाळ नारायण केळकर, ( ८ ) बळवंत नारायण साठ्ये.

**विशिष्ट देणगीदारः**—के. गोविंद भिकाजी फाटक तर्फे दत्तात्रय कृष्ण जोशी पुणें यांजकडून रु. ४०१ पारितोषिकाकरितां.

( ४ ) वृत्तान्ताचे वर्षीं आरंभीं ३२४ वर्गणीदार होते. नवीन वर्गणीदार १६ होऊन एकंदर संख्या ३४० झाली. वर्गणीदारांतुन परगांवीं २, आश्रयदाते १, मयत ११, वर्गणी न दिल्यामुळें ४, याप्रमाणें १८ संख्या कमी होऊन वर्षाअखेर ३२२ पटावर राहिले.

## शके १८६७ सालांतील साधारण सभावृत्त

**सभा १ लीः**—मिति भाद्रपद व॥ ९ रविवार दि. ३०-९-४४ मागील सहामाहींतील कामाचें थोडक्यांत निवेदन.

१ रा. कृ. शं. केळकर यांचे दर आठवड्यास सभेमध्यें सवेतन शास्त्री नेमून प्रवचन करावें अशा आशयाचे पत्राचा विचार झाला. या कामाची आर्थिक व्यवस्था कशी करावी यासंबंधीं योजना रा. केळकर यांनीं पुढील सभेपुढें ठेवावी.

२ रा. बाळकृष्ण धोंडदेव दिवेकर, अष्टे यांचें दि. २४-९-४५ चे पत्राचा विचार झाला. सांगली, रत्नागिरी या ठिकाणीं परीक्षा केंद्रें उघडावीं अशीं सूचना त्यांत होती. परंतु या प्रश्नाचा संपूर्ण विचार होऊन केंद्रें उघडूं नये असें ठरलें असल्यामुळें पत्र दप्तरीं दाखल.

३ श्रीमती पार्वतीबाई लिमये यांच्या दि. ६-५-४५ च्या पत्राचा विचार झाला. त्यांत त्यांनीं कांहीं अटीवर संस्थेस एक हजार रुपये देऊं केल्याबद्दलचा व त्यांचे श्वशुर के. रामचंद्र केशव लिमये यांचें त्यांनीं दिलेलें तैलचित्र संस्थेच्या

सभागृहांत लावण्याबद्दलचा मजकूर होता. त्यावर पुष्कळ चर्चा होऊन ठराव झाला. श्री. पार्वतीबाई लिमये या आपली रक्कम संस्थेच्या ताब्यांत तावडतोब देण्यास तयार असल्यास व तैलचित्रावर वास्तूसंबंधीं अथवा देणगीसंबंधीं उल्लेख नसल्यास इतर अटींसंबंधी संस्था विचार करील.

४ अध्यक्षांचे संमतीनें रा. बा. रा. किंकर यांची संस्थेनें वेदमहोत्सव साजरा करावा अशी सूचना विचारांत घेण्यांत आली, परंतु ती संस्थेच्या उद्देशास धरून नसल्यामुळें अमान्य झाली.

५ शेवटीं ग्वाल्हेरचे सेनापति कै. गणपतराव रघुनाथराव राजवाडे यांच्या निधनानिमित्त ( दि. १९-९-४५ ) दुखवटयाचा ठराव करण्यांत आला.

## साधारण सभा २ रीः-मिति फाल्गुन वद्य ६ रविवार

### दि. २४-३-४६ सायंकाळीं ४ वाजतां

(१) मागील ३०-९-४५ च्या सभेचें वृत्तांतवाचन व त्यांतील कामांचे निकाल निवेदन. (२) शके १८६७ सालांतील व्य. मंडळ व परीक्षा मंडळ यांच्या सभांचें त्रोटक वृत्तांतवाचन. (३) शके १८६७ चा अकरा महिन्याचा प्रत्यक्ष आयव्यव व दोन महिन्यांचा अंदाजी आयव्यय सभेपुढें मांडण्यांत आला त्या संबंधी चर्चा होऊन तो मान्य करण्यांत आला. नंतर शके १८६८ चें अंदाजी आयव्यय-पत्रक मांडण्यांत आलें व तें मान्य झालें. (४) श्री. कृ. शं. केळकर यांची सभेच्या विद्यमानें सभेच्या जागेंत प्रवचनें करवावी अशा आशयाची सूचना खर्चाची योजना नसल्यामुळें दप्तरी दाखल करण्यांत आली. (५) श्री. रामचंद्र शंकर दीक्षित यांची सभेनें संशोधन कार्य चालू करावें अशा आशयाची सूचना परिस्थिति व काल अनुकूल नाहीं म्हणून दप्तरीं दाखल करण्यांत आली. (६) रा. जोगळेकर यांची सभेच्या आयव्यव मांडणी पद्धती संबंधी सूचना मान्य करण्यांत आली. (७) रा. द. के. घाणेकर यांची विशिष्ट निधी अहवालांत निराळा दाखवावा यासंबंधीं सूचना मान्य करण्यांत आली. परंतु बक्षिसांची रक्कम वाढविण्यांत यावी ही सूचना अमान्य झाली. (८) वि. नि. चित्रावशास्त्री यांच्या संस्कृत भाषेच्या प्रसारासंबंधीं योजनेचा विचार झाला. प्रवेश परीक्षेपेक्षां सोपा असा तीन इयत्तांचा अभ्यासक्रम तयार करावा व त्याप्रमाणें परीक्षा सभेनें घ्याव्या त्या परीक्षांस ब्राह्मण ब्राम्हणेतर कोणासही बसतां यावें. त्यांत उत्तीर्ण होणारास प्रवेश परिक्षा सुलभ जाईल. इ. बऱ्याच वादविवादानंतर सभेची अनुकूलता नसल्यामुळें सूचना परत घेण्यांत आली. (९) सभेचे कोशाधिकारी श्री. धों. कृ. साठे यांची सभेच्या निधीपैकीं रु. ५१ हजार निराळया रीतीनें गुंतविण्याविषयींची योजना विचारांत घेऊन त्यासंबंधी प्रस्ताव करण्यांत आला. तो असा. प्रस्ताव ३ रा. " सभेच्या शिलके-

पैकीं ७०–७५ च्या ३ टक्के दराच्या ५१००० रुपयांच्या नोटांपैकीं जरूर तितक्या किंवा सर्व शंभर रुपयांपेक्षां कमी नाहीं अशा दरानें विकण्याचा अधिकार श्री. धों. कृ. साठे, कोशाधिकारी व श्री. द. गो. फडके कार्यवाह या उभयतांस एकत्रित देण्यांत येत आहे. मात्र त्यांनीं कार्याध्यक्ष श्री. के. वि. केळकर व आणखी दोन सभासद श्री. कृ. वि. पेंडसे व प्रा. द. वा. पोतदार यांची पूर्व अनुमती घ्यावी. सदरहू व्यवहार करतांना तीन टक्क्यांपेक्षां अधिक व्याज मिळण्याची दक्षता घ्यावी. ”

## शके १८६७ सालीं व्यवस्थापक मंडळ व परीक्षा मंडळ

### यांच्या ज्या सभा भरल्या त्यांचा त्रोटक वृत्तांत येणेंप्रमाणें:—

### व्यवस्थापक मंडळ.

**सभा १ लीः**—मिति चैत्र वद्य ७ शुक्रवार दि. ४–५–१९४५ (१) संस्थेच्या इमारतींतील एक भाडेकरी रा. अनासपुरे यांनीं भाडेचिठ्ठी लिहून दिली नसल्यामुळें त्यांजविरुद्ध कायदेशीर इलाज करावा. (२) नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकिटें विकत घेण्याबद्दल सर्व अधिकार कोशाधिकारी श्री. धों. कृ. साठे यांना देण्यांत यावे. (३) प्रवासाच्या अडचणी लक्षांत घेतां चालू वर्षीं चांचणीस आलेल्या विद्यार्थ्यांना रेल्वे तिसरा वर्ग अथवा मोटार भाड्याइतकी मदत द्यावी. (४) यंदा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं वेदशास्त्र व वक्तृत्व या विषयाच्या विद्यार्थ्यांस प्रत्येकीं रु. पांच व प्रवेश, नित्यकर्म या विषयाच्या विद्यार्थ्यांस प्रत्येकीं रु. दोन मदत म्हणून जास्त द्यावे.

**सभा २ रीः**—मिति वैशाख व. १४ दि. ९–६–४५ (१) विद्वत् परिषदेच्या प्रधान मंत्र्याकडून मदतीची मागणी आली आहे त्यास अनुसरून रु. पन्नास देण्यांत यावे. (२) संस्थेच्या वास्तूचा विमा रुपये वीस हजाराचा रा. गद्रे यांचेमार्फत उतरावा. (३) शिष्यवृत्तीसंबंधीं आलेल्या प्रार्थना पत्रांचा विचार होऊन चालू सालाकरितां दहा विद्यार्थ्यांस रु. ८०४ शिष्यवृत्ति म्हणून देण्याचें ठरलें.

**सभा ३ रीः**—मिति श्रावण वद्य ११ रविवार दि. २–९–४५ (१) सहामाही सभेचा दिवस व सभेपुढील कार्यक्रम ठरविण्यांत आला. (२) विद्यार्थी वामन बालकृष्ण भागवत याच्या शिष्यवृत्तीची रक्कम रु. ६० शिल्लक राहिल्यामुळें ती विद्यार्थी श्रीपाद शंकर दीक्षित तापस यांस देण्यांत यावी. (३) पुणें संस्कृत कॉलेजांतील शिक्षकांस पगार देण्याकरितां मदत द्यावी म्हणून त्या संस्थेकडून पत्र आलें त्यावरून शिष्यवृत्तीच्या रकमेपैकीं या वर्षापुरते रु. १२० द्यावे. (४) कार्यवाह म. ब्राह्मण सभा यांजकडून संस्थेच्या वास्तूंत म. ब्रा. सभेस कार्यालयाकरितां जागा भाड्यानें द्यावी अशी मागणी आली. परंतु संस्थेजवळ देण्यासारखी जागा

नसल्यामुळें देतां येत नाहीं असें कळवावें. ( ५ ) किरकोळ पत्रव्यवहार ( ६ ) पुण्याचे सुप्रसिद्ध घनपाठी वे. मू. गोविंद भटजी फाटय व संस्थेच्या आश्रयदात्या श्री. भागीरथीबाई बापट यांचे भ्रतार श्री. सदाशिवराव बापट यांचे निधनाबद्दल दुखवटयाचे ठराव करण्यांत आले.

**सभा ४ थीः**–मिति आश्विन शु. १३ शनिवार दि. १९-१०-४५ ( १ ) या दिवशीं गणसंख्येच्या अभावीं सभा तहकूब झाली व ती दि. २१-१०-४५ रोजीं भरली. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे स्मारक समिती इचलकरंजी यांचे-कडून आलेल्या पत्राचा विचार होऊन शिष्यवृत्ति व बक्षिसें देण्याचें काम बक्षिस समा-रंभाचे वेळीं करणें या संस्थेस शक्य आहे, श्रीमंतांचे श्राद्धतिथीस करणें जमणार नाहीं असें समितीस कळवावें. ( २ ) पर्वती रस्त्यावरील जागेबद्दल भाडेचिठ्ठी लिहून घेण्याची व्यवस्था करावी. ( ३ ) किरकोळ पत्रव्यवहार.

**सभा ५ वीः**—मिति मार्गशीर्ष शु. ३ शुक्रवार दि. ७-१२-४५ ( १ ) कै. पंपूशेट सुगंधी यांनीं आपल्या मृत्युपत्रानें संस्थेस दिलेल्या देणगीचा विचार झाला. मृत्युपत्रासंबंधी कै. पंपूशेट यांच्या पत्नीचें काय म्हणणें आहे तें मागवावें. ( २ ) प्रा. डॉ. न. का. घारपुरे यांनीं कै. म. मो. कुंटे यांचे ग्रंथप्रकाशनाबद्दल संस्थे-कडे विचारणा केली. त्यासंबंधीं निश्चित योजना तयार करून संस्थेकडे पाठवावी असें त्यांना कळविण्यांत यावें.

**सभा ६ वीः**—मिति माघ शु. ७ शुक्रवार दि. ८-२-४६ ( १ ) फाल्गुन महिन्यांतील साधारण सभेची मिति व परीक्षासमारंभाच्या व बक्षिससमारंभाच्या मिति ठरविण्यांत आल्या. ( २ ) शुद्ध पंचांग प्रवर्तन मंडळाचे विद्यमानें शुद्ध पंचाग तयार करण्याचें शिक्षण देणारा वर्ग चालविण्याकरितां संस्थेचें सभागृह सुमारें तीन महिने मागण्यांत आलें त्याप्रमाणें विनामूल्य द्यावें. ( ३ ) संस्थेचे कारकून रा. हिर्लेकर यांच्या दि. ४-२-४६ च्या अर्जाचा विचार होऊन त्यांस फेब्रुवारी १९४६ चे पगारापासून महागाईभत्त्यांत दरमहा रु. ६ वाढ द्यावी असें ठरलें. ( ४ ) साधारण सभेपुढें ठेवण्याकरितां शके १८६७ चा जमाखर्च व शके १८६८ चें अंदाजपत्रक तयार करण्यांत आलें. ( ५ ) संस्थेचे एक आजन्म सभासद श्रीमंत सरदार हरिहरराव काशिनाथराव तथा नानासाहेब खाजगी-वाले यांचे निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव करण्यांत आला.

**सभा ७ वीः**–मिती फाल्गुन व॥ १० गुरुवार दि. २८-३-४६ (१) शके १८६८ च्या चैत्रांत व्हावयाच्या परीक्षा–बक्षिस–समारंभाचे अध्यक्षपदाकरितां तीन नांवें सुचविण्यांत आली. १ प्रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, लॉ कॉलेज पुणें, २ श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, मॅनेजर बृ. म. शु. सिं. पुणें, ३ प्रा. गंगाधर नीलकंठ गोखले. (२) संस्थेच्या वास्तूंतील भाडेकऱ्याकडे असलेल्या जागेस रंग-

सफेती करावी व जमिनी करून घ्याव्या. त्याकरितां लागणाऱ्या खर्चास रु. १५० पर्यंत मंजुरी. (३) श्रीक्षेत्र गोकर्ण येथील वे. मू. बालकृष्ण वासुदेव जोगळेकर यांच्या अग्निष्टोम यज्ञास रु. १० मदत द्यावी. (४) विद्यार्थी कृष्ण विश्वनाथ बापट, काशी यानें परीक्षा दिली व उत्तीर्ण झाला तर यंदाची शिष्यवृत्ति द्यावी. (५) कै. वे. मू. गोविंद भटजी फाटक स्मारक मंडळाकडून सभेकडे रु. २५० आले त्याचा स्वीकार. त्यांचे स्मरणार्थ त्यांचे मृत्युतिथीस श्रा. शु॥ ७ मंत्र जागर करण्यांत यावा.

## परीक्षा-मंडळ.

**सभा १ लीः**—मिती चैत्र वद्य ५ सोमवार दि. २-४-४५ (१) अध्यक्ष उपस्थित नसल्यामुळें सभा दुसरे दिवशीं घेण्यांत आली. दुसरे दिवशीं शके१८६७ सालच्या परीक्षांकरितां परीक्षक नेमण्यांत आले. ( २ ) परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा पत्रव्यवहार. ( ३ ) परीक्षेस विद्यार्थी कमी असल्यामुळें पांच विद्यार्थ्यांपेक्षां जास्त ज्या विषयास असतील त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका छापाव्या बाकीच्या हस्तलिखित कराव्या.

**सभा २ रीः**—मिति चैत्र वद्य ८ शनिवार दि. ५-५-४५ ( १ ) निरनिराळ्या विषयांतील परीक्षांचे निर्णय देण्यांत आले.

**सभा ३ रीः**—मिति वैशाख वद्य ५ गुरुवार दि. ३१-५-४५ ( १ ) उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येवरून त्या त्या विषयांच्या गुरुजींच्या संभावनेची रक्कम ठरविण्यांत आली.

**सभा ४ थीः**—मिति कार्तिक वद्य ४ शुक्रवार दि. २३-११-४५ (१) पुढील वर्षाकरितां पं. पुरुषोत्तमशास्त्री रानडे यांची परीक्षा मंडळाचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमतें निवड करण्यांत आली.

**सभा ५ वीः**—मिति माघ शु. १४ शुक्रवार दि. १५-२-४६ ( १ ) संस्कृत वक्तृत्वाकरितां ( १ ) दुर्भिक्षम् ( २ ) प्रामाण्यम् ( ३ ) राष्ट्रीयत्वम् असे तीन विषय ठरविण्यांत आले.

**सभा ६ वीः**—मिति फाल्गुन वद्य ९ बुधवार दि. २७-३-४६ ( १ ) शके १८६८ सालच्या परीक्षांकरितां आलेल्या अर्जांचा विचार झाला. ( २ ) निरनिराळ्या विषयांकरितां परीक्षक नेमण्यांत आले.

## परीक्ष्य विद्यार्थ्यांचें स्थलवार वर्गीकरण

### गांव व संख्या

पुणें १०, पंढरपूर १०, धारवाड ११, सांगली ६, वाई ६, चिंचवड ६, इचलकरंजी ४, सातारा ३, रत्नागिरी २, सुरत २, कुरुंदवाड १, चाफळ १, शहापूर १, मुत्नाळ १, अलिबाग १, नाशिक १, काशी १.

## परीक्ष्य विद्यार्थ्यांची विषयवार संख्या.

| | एकंदर | उपस्थित | उत्तीर्ण |
|---|---|---|---|
| १ वेदपठण | ५ | ५ | ५ |
| २ याज्ञिक | १ | १ | ० |
| ३ व्याकरण | ३ | ३ | ३ |
| ४ न्याय | ९ | १ | १ |
| ५ अ. वेदान्त | २ | १ | १ |
| ६ दर्शनें | ३ | २ | २ |
| ७ सांख्य योग | २ | २ | २ |
| ८ ज्योतिष | २ | २ | १ |
| ९ साहित्य | १ | ० | ० |
| १० काव्य | ३ | ३ | २ |
| ११ वैद्यक | २ | २ | ० |
| १२ संगीत | १ | १ | १ |
| १३ प्रवेश | ८ | ८ | ७ |
| १४ वेदांगें | ८ | ८ | ८ |
| १५ सं. वक्तृत्व | ६ | ५ | ३ |
| १६ नित्यकर्म | २३ | १९ | १८ |
| १७ चाचणी | ११ | ९ | ९ |
| | ८२ | ७१ | ६३ |

## शके १८६८ सालचा परीक्षा व पदव्या-पारितोषिक वितरण-समारंभ

वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या विद्यमानें दरसाल होणाऱ्या परीक्षा यंदा चैत्र व. ६ शके १८६८ सोमवार दि. २२ एप्रिल १९४६ या दिवशीं दुपारीं ३ वाजतां नूतन मराठी विद्यालयाच्या जागेंत सुरू झाल्या. त्या आठवडाभर चालून वेदपठण व निरनिराळीं शास्त्रें यांच्या परीक्षांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रमाणपत्रें, पारितोषिकें व पदव्या देण्याचा समारंभ मिति चैत्र व. १२ रविवार दि. २८-४-४६ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां नू. म. विद्यालयाच्या प्रशस्त सभागृहांत मोठ्या यशस्वी रीतीनें साजरा करण्यांत आला. समारंभाचें अध्यक्षस्थान पुणें येथील सुप्रसिद्ध कॉंट्रॅक्टर रावबहादुर धरणीधर कृष्ण रानडे यांनीं मंडित केलें होतें.

समारंभास स्थानिक व परस्थ अशी बरीच शास्त्रीमंडळी व गृहस्थ उपस्थित होते. वे. मू. महादेव भट पुरोहित, मलकापूर वे. मू. सखाराम भट यड्डूरकर, नरसोबावाडी, पं. रघुनाथशास्त्री काजरेकर, राजापूर, पं. पांडुरंगशास्त्री गोस्वामी, सातारा, पंचागकर्ते ज्योतिषालंकार रामचंद्रशास्त्री मोघे, वसई, पं. सुब्रम्हण्यशास्त्री पाटणकर, पं. पुरुषोत्तमशास्त्री रानडे, पं. गोविंदशास्त्री पंढरपुरे, पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन, पं. खाडिलकरशास्त्री, पं. शंकरशास्त्री भिलवडीकर, वे. मू. परशुराम गद्रे, गुरुजी. इत्यादि.

शिवाय केसरीचे संपादक श्री. तात्यासाहेब करंदीकर, प्रा. मो. ल. चंद्रोदय, प्रा. सखारामपंत आपटे, श्री. नीलकंठराव जोगळेकर वकील, श्री. श्री. बा. जोग, श्री. ग. गो. गोरे, भिषगाचार्य त्र्यंबकराव आपटे, आयुर्वेदरत्न अ. य. जोशी, आयुर्वेदाचार्य मा. ग. जोशी.

सुरवातीस गायक बबनराव कुलकर्णी यांचें सुश्राव्य गायन अर्धा तास पावेतों झाल्यावर सभेचे कोषाधिकारी श्री. घोंडो कृष्ण साठे यानीं उपस्थित मंडळीचें यथोचित शब्दांत स्वागत केलें व समारंभाचे अध्यक्ष रा. ब. रानडे यांचा परिचय करून दिला. तो करतांना रा. बहादुरांची हिंदुधर्माविषयीं आस्था, सनातनी वृत्ति, संस्कृत वाङ्मयाविषयीं आवड व अभिमान इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून त्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंति केली. या सूचनेस पं. रानडेशास्त्री यानीं गीतर्वाण भाषेंत भाषण करून अनुमोदन दिलें. त्यानंतर अध्यक्ष स्थानापन्न झाले. पुढील कामास सुरुवात झाली.

कार्यवाह श्री. द. गो. फडके यांनीं शके १८६७ सालांतील संस्थेच्या कार्याचा सांपत्तिक व इतर अहवाल वाचून दाखविला. नंतर कार्यवाह विद्यानिधि चित्रावशास्त्री यानीं परीक्ष्य विद्यार्थ्यांचें स्थलवार व विषयवार वर्गीकरण सांगून एकंदर विद्यार्थ्यांची संख्या थोडी दिसली तरी ऋग्वेद वेदपठण, व्याकरण, ज्योतिष या विषयांच्या सर्वांत उच्च परीक्षेस व संगीत या विषयांत प्रथमच विद्यार्थी आले असल्यामुळें परीक्षांना विशेष महत्व होतें. मध्यंतरीं जी विद्यार्थ्यांच्या संख्येंत विशेष वाढ झालेली दिसत होती ती प्रवेश व नित्यकर्म यांतच होती, त्यानंतर उपस्थित मंडळीपैकीं कांहींचीं भाषणें झालीं. मीमांसा विद्वान सुब्रम्हण्यशास्त्री पाटणकर यांनीं प्रथम मराठीतून व नंतर संस्कृतमधून संस्कृत विद्येच्या अभ्यासांतील हल्लीच्या काळच्या अडचणी निवेदन करून त्यांना तोंड देऊन विद्यार्थ्यांनीं अध्ययन चालू ठेवलें पाहिजे असा उपदेश केला. नंतर पं. रघुनाथशास्त्री काजरेकर यानी संस्कृत विद्या शिकणारानीं इतर विद्यांची आपल्या ज्ञानास जोड दिली पाहिजे कारण दिवसेंदिवस संस्कृत विद्या मागे पडत चालली असून त्या विद्येला आश्रय नाहींसा होत चालला आहे असें दर्शविलें. नंतर पं. गोविंदशास्त्री पंढरपुरे यानीं संस्कृत

विद्येचें अध्ययन करणारांस प्रोत्साहन देणारें व आत्मविश्वास उत्पन्न करणारें भाषण केलें. त्यांत त्यांनीं असें दर्शविलें कीं, विद्येच्या जोडीस कला हस्तगत केली तर त्या विद्येस तेज चढतें व व्यावहारिक उपयुक्तता प्राप्त होते. उ. कीर्तन, प्रवचन व्याख्यान या कलांमध्यें नैपुण्य मिळविल्यास हल्लींच्या औदासिन्याच्या काळांतही उपजीविकेची विवंचना केव्हांही उत्पन्न होत नाहीं.

नंतर अध्यक्षांच्या हस्तें उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पारितोषिकें, पदव्या व प्रमाणपत्रें देण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर अध्यक्षांचें भाषण झालें. त्यांनीं आपलें भाषण संस्कृत भाषेंत लिहून छापून आणलें होतें, त्याच्या प्रति उपस्थित मंडळीस देण्यांत आल्या. परंतु प्रत्यक्ष भाषण मराठींतून वरील लेखी भाषणाच्या सारांशरूपानें त्यांनीं केलें ( तें पुढें सविस्तर दिलें आहे ). हल्लीं प्रचलित असलेल्या अभ्यासक्रमांत कोणता बदल केला असतां संस्कृत विद्येकडे जास्त विद्यार्थी येऊं लागतील व उपयुक्तता वाढेल असा अभ्यासक्रम विद्वानांनीं आखावा व त्या कामीं वेदशास्त्रोत्तेजक सभेनें पुढाकार घ्यावा असें अध्यक्षांनीं सुचविलें व या कामाच्या प्राथमिक खर्चाकरितां रु. १००।- ची सभेस देणगी दिली. नंतर अध्यक्षस्थान दिल्याबद्दल सभेच्या चालकांचे आभार मानून भाषण संपविलें.

नंतर स्वागताध्यक्ष श्री. धों. कृ. साठे यांनीं अध्यक्षांस पुष्पहार घातला व पानसुपारी अत्तर गुलाब दिला.

शेवटीं वि. नि. चित्रावशास्त्री यांनीं अध्यक्षांचे आभार मानले व समारंभ यशस्वी करण्यास विविध प्रकारें साहाय्य केल्याबद्दल नू. म. विद्यालयाचे मुख्याधिकारी प्रा. बापट, रेशनिंग ऑफिसर श्री. जठार, दुकानदार रा. माधवराव कुलकर्णी, विद्यार्थ्यांच्या भोजनाची गैरसोईच्या दिवसांतही उत्तम सोय केल्याबद्दल श्रीमती बयाताई बापट, श्री. नी. पु. जोगळेकर वकील यांनीं समारंभाचे वेळीं मदत केली त्या बद्दल व श्री. बबनराव कुलकर्णी यांनीं विनामूल्य गायन केल्याबद्दल त्यांचे आभार मानल्यावर सर्व मंडळीस पानसुपारी होऊन समारंभाचें काम समाप्त झालें. नंतर रसपान झालें त्या कामीं आयुर्वेद रत्न अ. य. जोशी व आयुर्वेदाचार्य मा. ग. जोशी यांनीं विशेष साहाय्य केलें त्याबद्दल सभा त्यांची आभारी आहे.

आपले

मिती चैत्र व॥ १२<br>रविवार शके १८६८

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव,<br>दत्तात्रय गोपाळ फडके,<br>कार्यवाह.

# श्रीशंकरः शरणम् ।

श्री शा. १८६७ शाकीयवेदशास्त्रोत्तेजकसभावार्षिकसमारम्भाध्यक्षाणां 'रावबहादुर धरणीधर कृष्ण रानडे कॉन्ट्रॅक्टर' महाशयानामध्यक्षीयभाषणस्य संक्षिप्तः संस्कृतभाषामयोऽनुवादः ।

अयि विद्वांसः सभ्याः । अध्यक्षस्थाने नियुक्तः कोऽपि नरः प्रथमं निजप्रस्तावभाषणे प्रायः एवं ब्रूते यत्, 'नाहं विद्वान् न वा पंडितः नापि वक्ता न चापि शास्त्री' इत्यादि । परं तत् औपचारिकं भवति । मम विषये तु तथा न । अध्यक्षपदं विशेषतः विदुषां सभायां स्वीकर्तुं न खलु ममाधिकारः । नाहं विद्वान् न वक्ता । मम आयुः प्रायः स्थापत्यकार्ये मृत्प्राणेष्टिकासुधादिवस्तुषु कर्मकरैः सह व्यतीतम् । तस्मिन् कार्ये एकोऽपि संस्कृतशब्दः मया नोक्तः न श्रुतो वा । अतः अध्यक्षपदार्थे आकारयितुं मम सुहृदः श्रीमन्तः फडके दत्तोपंतमहाभागाः मत्सविधे आयाताः तदैव 'मदपेक्षया विशेषाधिकारिणः सभापतयः अन्वेष्टव्याः' इति ते मया संप्रार्थिताः । परं कार्यकारिमंडलेन श्रीमन्त एव निर्धारिताः इति अन्याध्यक्षस्य अन्वेषणं माभूत् इत्युक्त्वा ते फडके महाशया मदीयां प्रार्थनां न गणयन्ति स्म । अतः विदुषां आज्ञां शिरसि कृत्वा मयैतत् अध्यक्षपदं स्वीकृतम् । अनेन बहुमानसूचकस्थानप्रदानेन मदीयगौरवेण च बहूपकृतोऽस्मि सभासंचालकानां विदुषाम् । इत उत्तरं यन्मयोच्येत तत् सकलं क्षमाधनाः श्रीमन्तः मधुरं कुर्युः इति सविनयं प्रेमभावेन च प्रार्थये ।

अस्याः सभायाः इतिहासे विलोकिते सभेयं अद्ययावत् सप्ततिसंवत्सरपर्यंतं वेदशास्त्रोद्धारस्य कार्यं करोति महदेतत् प्रमोदास्पदं कुतूहलोत्पादकं च कार्यम् । परःसहस्राः विद्यार्थिनः सभया अनया परीक्षिताः भारतवर्षेऽस्मिन् तत्र तत्र 'विद्वांसः' इति प्रथंते । इयं सभा नाम न केवलं पुण्यपुरस्य, न वा महाराष्ट्रस्य अपि तु अशेषस्यापि भरतखंडस्य भूषणभूता इति मे मतिः । एतादृशाः संस्थाः अपेक्ष्यन्ते एव । एतस्मिन् विषये मतभिन्नताया अवसरो नास्त्येव ।

संप्रति जागतिकपरिस्थित्या जनतायाः दृष्टिकोणः विपरिवृत्तो दृश्यते । लोकेषु यथा पूर्वे प्राचीनविद्वत्सु वैदिकेषु शास्त्रिपंडितेषु वा आदर आसीत् तथा इदानींतने काले न दृश्यते । तथा विद्यया जीवनयात्राऽपि महता संकटेन संपाद्यते । अतः वेदशास्त्राध्ययने मंदादरा भवन्ति विद्यार्थिनः । एवं सत्यपि नास्माभिः वेदशास्त्राध्ययनविषये उदासितव्यम् । अस्मत्पूर्वजैः भृगुवसिष्ठभरद्वाजादिभिः ऋषिप्रवरैः अस्मासु संगोपनार्थे निहितं वेदशास्त्रस्वरूपं अन्यत्र सुदुर्लभमलौकिकं द्रव्यं यदि अस्माभिः न संरक्षितं तर्हि तत्संगोपनं के कुर्युः ! 'वेदोऽखिलो धर्ममूलम्' 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते' 'धर्मो रक्षति रक्षितः' इति वाक्यत्रयं वेदशास्त्रोत्तेजकसभायाः प्राणाः । युक्तं चैतत् । इतरधर्मीयाः तदनुयायिनश्च राजाश्रयेण लोकाश्रयेण च स्वकीयधर्मस्य आत्मनः संस्कृतेश्च समुत्कर्षं संपादयितुं नानाविधान् क्लेशान्

सोढ्वा द्रव्यराशीनपि व्ययीकृत्य इतरैश्च विविधैः प्रकारैश्च प्रयतन्ते, धर्मोपदेशकान् प्रचारयन्ति संस्थाश्च निर्मापयन्ति तथाऽस्माभिरपि स्वकीया धर्मसंस्था निजसंस्कृतिः प्रयत्नशतेनापि परिपालनीया उत्तरोत्तरं संवर्धनीया च। एकमेव यदि बहुत्र बहुविधाः प्रयत्ना जायेरन् तर्ह्येव अस्माकं प्राचीनविद्या जीवेयुः नो चेत् शनैः शनै नामशेषतामेव अनुदिनं प्राप्नुयुः' तस्मात् यावत्ता विद्या न श्रुतिशेषं प्राप्ताः तावदेव तासां रक्षणार्थं संवर्धनार्थं च वयं दृढबद्धपरिकरा भवामः।

अद्य इयं सभा विविधविषयेषु उत्तीर्णेभ्यो विद्यार्थिभ्यो गुणानरूपं पारितोषिकं प्रमाणपत्रं च वितीर्य तेषां, तद्द्वारा च वेदशास्त्राणां सभाजनं कुरुते तेन च तदध्ययने विद्यार्थिनामभिरुचिं च संवर्धयति महदेतत् प्रमोदस्थानम्।

वत्सरेऽस्मिन् ये विद्यार्थिनः परीक्षायामुत्तीर्णाः पारितोषिकं प्रमाणपत्रं च लब्धवन्तः तानहं सादरमभिनन्दामि। आत्मीयतया संसूचयामि च यत्, तैः इयतैव अभ्यासेन न कृतार्थैर्भाव्यम्। किंतु संततमेव तत्तद्विषयस्य पठनं पाठनं च प्रचालनीयम्। ये च विद्यार्थिनः केनापि हेतुना परीक्षायामनुत्तीर्णाः तैरपि विषण्णान्तःकरणैर्न भवितव्यम्। आगामिनि संवत्सरे परीक्षायां सुबहून् गुणान् संपाद्य इतोऽप्यधिकतरं पारितोषिकं सुयशश्च समुपार्जनीयमिति तानहं आत्मीयतया प्रोत्साहयामि।

मान्यवराः! अधुना अत्र बहूनां वक्तॄणां समयोचितानि वेदशास्त्रप्रशंसनपराणि भाषणानि अभवन्। तत्र सर्वोऽपि वक्तव्यो विषय उक्तप्राय एव। इतोऽप्यधिकं किं मया वक्तव्यम्।

अन्ततश्च वेदशास्त्रोत्तेजकसभावार्षिकसमारंभे महाराष्ट्रभाषामयं भाषणं न तावदुचितमिति शालीयज्ञानमेवावलम्ब्य तदाश्रयेण कथंकथमपि संस्कृतभाषयैव निजमनोरथाः प्रकटीकृताः। तत्र भूयसां दोषाणां संभवः। तान् दोषान् क्षमेरन् सदस्याः इति विश्वस्य उत्तरोत्तरं सभाया एतस्या उत्कर्षो भवतु इति परमेश्वरचरणकमले प्रार्थनां विधाय युष्माकं सर्वेषां मम भाषणं शांततया श्रुतमिति उपकृतिभरान् शिरसि संधार्य विरमामि।

## परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें,

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय इयत्ता व पदवी | तोंडीगुण ५० (वेदपठणांत मात्र १००) |
|---|---|---|---|---|
| १ | १७१३ | सखाराम महेश्वर पाध्ये<br>कोलघें | ऋ. वेद-पठण इ. ३<br>चूडामणि | १९० |
| २ | १७१४ | रंगनाथ श्रीधर जोशी<br>इचलकरंजी | इ. २ री<br>कोविद | १७५ |
| ३ | १७१५ | विनायक श्रीपाद गाडगीळ<br>कुरुंदवाड | ,,<br>इ. १ | १५० |
| ४ | १७१६ | गोविंद बापूभट परांजपे<br>अलिबाग | ,, | १५५ |
| ५ | १७१८ | रामचंद्र रंगनाथ वांगीकर<br>पंढरपूर | शु. य. वेद-पठण<br>कोविद<br>इ. २ | १६० |
| ६ | १७१९ | वामन बाळकृष्ण भागवत<br>चाफळ | व्याकरण<br>इ. ३<br>चूडामणि | २८ |
| ७ | १७२० | रामचंद्र कृष्ण गाडगीळ, रत्नागिरी | ,, | २५ |
| ८ | १७२१ | महादेव वामन नामजोशी<br>रत्नागिरी | इ. १<br>,, | २६ |

## त्यांचे गुण व त्यांना दिलेल्या पारितोषिकांचा तपशील

| लेखी गुण १५० | बक्षिसाची रक्कम | बक्षिस कोणाच्या नांवानें व किती |
|---|---|---|
| ० | ५० | श्रीमंत पं. रघुनाथराव शंकरराव उर्फ बाबासाहेब पंतसचिव राजे, भोर रु. २५ + रा. दत्तात्रय केशव घाणेकर, दादर यांजकडून कै. लक्ष्मण बाळकृष्ण ऊर्फ अण्णासाहेब घाणेकर यांचे स्मरणार्थ रु. १५ + कै. वे. घ. पा. गोविंदभटजी फाटक रु. १०. |
| ० | २६ | रा. हरी गोपाळ आठवले, पुणें स्वतःचे रु. १३ + कै. रा. ब. नारायणराव गोविंद आपटे यांजकडून स्वतःचें नांवें रु. १३ |
| ० | २० | रा. सिताराम वासुदेव वैद्य, नागपूर यांजकडून ती. कै. वासुदेवभटजी वैद्य यांचे स्मरणार्थ |
| ० | २० | श्रीमती सिताबाई भ्र. सावळाराम पानसे, पुणें भर्तृ स्मरणार्थ रु.५+ रा.माधव वामन पुरोहित, सातारा यांजकडून कै. श्री. बगूबाई शिवापुरकर यांचें स्मरणार्थ रु. ५+ रा. दिगंबर विष्णु केळकर, पुणें यांजकडून मातोश्री कै. रमाबाई केळकर यांचें स्मरणार्थ रु. १० |
| ० | २६ | रा.दत्तात्रय केशव घाणेकर,दादर यांजकडून कै.लक्ष्मण बाळकृष्ण ऊर्फ अण्णासाहेब घाणेकर यांचें स्मरणार्थ रु. १० +रा. धोंडो कृष्ण साठे, पुणें बंधु कै. पुरुषोत्तम कृष्ण साठे यांचें नांवें रु. ६+रा.ब.गोविंद महादेव वैद्य पुणें स्वतःचें नांवे रु. ६ +रा. गोपाळ दामोदर वाडदेकर यांजकडून कै. मातोश्री लक्ष्मीबाई इचे स्मरणार्थ रु.४ |
| ९४ | ४४ | कै. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, सं. इचलकरंजी यांचें स्मरणार्थ रु. ३० + सौ. श्री. उमाबाई केशव जोशी, श्रीवर्धन यांजकडून कै. रा. ब. दा. ग. पाध्ये यांचें स्मरणार्थ रु. ३ + कै. पां. वि. चितळे, सातारा यांजकडून कै. चि. केशवराव चितळे यांचें स्मरणार्थ रु. ११ |
| ७७ | १५ | कै. नरहर रावजी बीडकर यांजकडून स्वतःचें नांवें. |
| ७६ | १५ | श्री. गणेश भास्कर गानू सातारा यांजकडून ती कै.ती. केशव हरी गानू यांचे नांवे रु. १३+ रा.ब.गोविंद महादेव वैद्य पुणें रु. २ |

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय इयत्ता व पदवी | तोंडीगुण ५० ( वेदपठणांत मात्र १०० ) |
|---|---|---|---|---|
| ९ | १७२२ | गुरुमुर्ति शास्त्री पंपाशास्त्री सिंदगी<br>धारवाड | न्याय<br>इ. २<br>कोविद | ३४ |
| १० | १७२३ | गोपीनाथ गंगाधर केळकर<br>सातारा | अ. वेदान्त<br>इ. १ | ३४ |
| ११ | १७२४ | एकनाथ गुंडामहाराज देगलूरकर<br>पंढरपूर | दर्शनें<br>इ. १ | ३६ |
| १२ | १७२५ | रामचंद्र केशव डोंगरे<br>काशी | ,, | ३५ |
| १३ | १७२६ | दत्तात्रय वासुदेव केळकर<br>सांगली | सांख्य<br>इ. १ | ३२ |
| १४ | १७२७ | पांडुरंग वासुदेव केळकर<br>सांगली | ,, | ३३ |
| १५ | १७२८ | यलगुर्दभट्ट सुबण्णभट्ट जोशी<br>धारवाड | ज्योतिष<br>इ. १ | २७ |
| १६ | १७२९ | दत्तात्रय केशव आघारकर<br>पुणें | काव्य | ३८ |
| १७ | १७३० | रामचंद्र केशव जोशी<br>पुणें | इ. १<br>,, | ३१ |

| लेखी गण १५० | बक्षिसाची रक्कम | बक्षिस कोणाच्या नांवानें व किती |
|---|---|---|
| ७७ | २१ | श्री. यशोदाबाई भ्र. नरहर बापूजी टोकेकर यांजकडून स्वतः करितां रु. १५ + रा. दिगंबर विष्णु केळकर, पुणें यांजकडून मातोश्री के. रमाबाई केळकर इचें स्मरणार्थ रु. ६ |
| ९२ | १७ | रा. ब. गोविंद महादेव वैद्य, पुणें यांजकडून स्वतःचें नांवें. |
| ८५ | १५ | श्री. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर, पुणें स्वतःचें नांवें रु. ५+वैद्य गोविंद दत्तात्रय भावे, पुणें स्वतःचे नांवें रु. १० |
| ८१ | १५ | श्री.विनायक महादेव लिमये, पुणें यांजकडून के. डॉ. महादेव विनायक लिमये यांचें स्मरणार्थ. |
| ७५ | १५ | "मुकुंद भुवन" संस्थेतर्फे शेट मुरलीधर चतुर्भुज लोह्या यांजकडून. |
| १०६ | १७ | "मुकुंद भुवन" संस्थेतर्फे शेट मुरलीधर चतुर्भुज लोह्या यांजकडून रु. ५+रा. सिताराम नागेश दातार यांजकडून आजेब्रम्हीभूत गंगाधरशास्त्री मणिरामभट दातार यांचें नांवें रु. ३+रा. त्र्यंबक गोविंद जोगळेकर यांजकडून के. ती. वेदमूर्ती गोविंदभट बिन गणेशभट जोगळेकर यांचें नांवें रु. ३ + श्री. जानकीबाई भ्र. लक्ष्मणराव भागवत भर्तृस्मरणार्थ रु. ३+ श्रीमती अन्न-भ्र. पूर्णाबाई शंकर केशव साठे, पुणें यांजकडून के. ती. अनंत हरी गोखले यांचे स्मरणार्थ रु. ३ |
| ७५ | १५ | श्री. श्रीपाद विश्वनाथ नाईक यांजकडून के. ती. विश्वनाथ बळवंत नाईक यांचें स्मरणार्थ रु. १३+रा. वासुदेव विनायक पटवर्धन, पुणें स्वतःचें नांवें रु. २. |
| ९१ | ११ | रा. हरी गोपाळ आठवले यांजकडून स्वतःचें नांवें |
| ८० | १२ | रा. नारायण गणेश गर्दे, पुणें यांजकडून डॉ. के. गणेश कृष्ण गर्दे यांचें स्मरणार्थ रु. १०+रा. ब. कोंडो महादेव ऊर्फ दादासाहेब कुमठेकर, पुणें यांजकडून के. श्री. रा. ब. माधवराव कुमठेकर यांचें स्मरणार्थ रु.२ |

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय इयत्ता व पदवी | तोंडीगुण ५० ( वेदपठणांत मात्र १०० ) |
|---|---|---|---|---|
| १८ | १७३१ | सदाशिव गंगाधर मुंडल्ये<br>पुणें | संगित कोविद इ. २ | ५९ |
| | | **संस्कृत विद्येचा इतिहास** | | |
| १९ | | राजाराम भास्कर नाटेकर<br>वाई | वक्तृत्व | ६० |
| २० | | पांडुरंग कृष्णाजी दांडेकर<br>वाई | ,, | ५६ |
| २१ | | गणेश कृष्ण दिवेकर<br>सांगली | ,, | ४८ |
| | | **नित्यकर्म** | | |
| २२ | | आत्माराम सखाराम मोघे<br>पुणें | इ. २ ऋग्वेद | ५७ |
| २३ | | सिताराम सखाराम मोघे<br>पुणें | | ५६ |
| २४ | | गोपाळ कृष्ण दीक्षित<br>वाई | | ६३ |
| २५ | | सिताराम शंकर सप्रे<br>वाई | | ६९ |
| २६ | | गजानन कृष्ण महाबळेश्वरकर<br>वाई | | ५३ |
| २७ | | महादेव गणेश पुजारी<br>सांगली | | ५२ |
| २८ | | प्रभाकर महादेव टेंगसे, सांगली | | ५२ |
| २९ | | लक्ष्मण नारायण कशाळीकर, सुरत | | ६० |
| ३० | | आत्माराम सखाराम मोघे<br>पुणें | | ५९ |

| लेखी गुण १५० | बक्षिसाची रकम | बक्षिस कोणाच्या नांवानें व किती |
|---|---|---|
| १०३ | २९ | शेठ मोतीलाल माणिकचंद्र ऊर्फ प्रतापशेट गुजर अमळनेर यांजकडून. |
| | १५ | कै. सौ. गोपिबाई देशमुख यांजकडून स्वतःचें नांवें |
| | १२ | श्री. मोरेश्वर सदाशिव फडके, पुणें यांजकडून ती. कै. सदाशिव गणेश ऊर्फ बाळूकाका फडके यांचें नांवें " बळवंत पारितोषक. " |
| | ८ | श्री. मोरेश्वर सदाशिव उर्फ बाबूराव फडके, पुणें यांजकडून कै. ती. सदाशिव गणेश बाळूकाका फडके यांचें नांवें "बळवंत पावितोषिक." |
| | ५ | श्री. मुकुंद कृष्ण परांजपे, पुणें यांजकडून कै. ती. कृष्णराव परांजपे यांचें नांवें. |
| | ५ | कै. वामन नारायण गोडबोले यांजकडून कै. ती. विष्णु गोडबोले यांचे स्मरणार्थ २ रु.<br>" " ३+ |
| | ५ | कै. राव. भिकाजी रघुनाथ मेहेंदळे याजकडून कै. ती. रघुनाथ श्रीधर व मातोश्री जानकीबाई यांचे स्मरणार्थ हरेश्वर पारितोषिक. |
| | ६ | श्रीमती द्वारकाबाई तपस्वी पुणें यांजकडून कै. ती. नरहर यशवंत ऊर्फ भाउभटजी दिवेकर रु. ३ + रा. नारायण गणेश लोंढे याजकडून कै. मातामह ब्र. भू. कृष्णशास्त्री राजवाडे यांचें नांवें रु. ३ |
| | ५ | " सखुबाई स्मारक निधीतून " |
| | ५ | " " |
| | ५ | " " |
| | ५ | " " |
| | ३ | श्री. मुकुंद कृष्ण परांजपे पुणे यांजकडून कै. ती. मातोश्री लक्ष्मीबाई परांजपे यांचे स्मरणार्थ रु. ३ |

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय इयत्ता व पदवी | तोंडीगुण ५० ( वेदपठणांत मात्र १०० ) |
|---|---|---|---|---|
| ३१ | | सिताराम सखाराम मोघे<br>पुणें | इ. १ | ५५ |
| ३२ | | गोपाळ कृष्ण दीक्षित<br>वाई | ,, | ५५ |
| ३३ | | सिताराम शंकर सप्रे<br>वाई | ,, | ६५ |
| ३४ | | गजानन कृष्ण महाबळेश्वरकर<br>वाई | ,, | ५६ |
| ३५ | | महादेव गणेश पुजारी<br>सांगली | ,, | ५३ |
| ३६ | | प्रभाकर महादेव टेंगसे<br>सांगली | ,, | ५३ |
| ३७ | | लक्ष्मण नारायण कशाळीकर<br>सुरत | ,, | ५५ |
| ३८ | | भास्कर गुंडशास्त्री हरिदास<br>धारवाड | शु. य. कण्व<br>इ. २ | ६२ |
| ३९ | | व्यंकटेश त्र्यंबक तेगूर<br>धारवाड | ,, | ८० |
| ४० | | भास्कर गुंडशास्त्री हरिदास<br>धारवाड | इ. १ | ७० |
| ४१ | | व्यंकटेश त्र्यंबक तेगूर<br>धारवाड | ,, | ५७ |
| ४२ | | बाळकृष्ण रंगनाथ फरकंडेकर<br>पंढरपूर | ,, | ६२ |
| ४३ | | व्यंकटेश स्वामीराक कोंड्डुजी<br>धारवाड | ,, | ५३ |
| ४४ | | दिवाकर गोपाळभट्ट जोशी<br>पंढरपूर | माध्यंदिन<br>इ. २ | ७० |
| ४५ | | लक्ष्मीकांत पंढरीनाथ जाभूरकर<br>पंढरपूर | इ. १ | ६६ |
| ४६ | | पांडुरंग भगवानशास्त्री धारुरकर<br>पंढरपूर | ,, | ७१ |

| लेखी गुण १५० | बक्षिसाची रक्कमा | बक्षिस कोणाच्या नांवानें व किती |
| --- | --- | --- |
| | ३ | श्री. मुकुंद कृष्ण परांजपे, पुणें यांजकडून कै. ती. मातुश्री लक्ष्मीबाई परांजपे यांचे स्मरणार्थ रु. २ + रा. अनंत बाळकृष्ण क्षीरसागर, पुणें यांजकडून रु. १ |
| | ३ | |
| | ३ | |
| | ३ | |
| | ३ | |
| | ३ | |
| | ३ | |
| | ५ | |
| | ६ | "विद्यार्थी सहायक मंडळ पुणें यांजकडून." |
| | ४ | |
| | ३ | |
| | ३ | |
| | ३ | |
| | ६ | |
| | ३ | |
| | ४ | |

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय इयत्ता व पदवी | तोंडीगुण ५० ( वेदपठणांत मात्र १०० ) |
|---|---|---|---|---|
| | | **नित्यकर्म** | | |
| ४७ | | गोविंद प्रल्हाद औसेकर<br>पंढरपूर | माध्यंदिन<br>शु.य. इ.१ | ६० |
| ४८ | | अच्युत लक्ष्मण केळकर<br>सातारा | शिक्षा चतु. | ५२ |
| ४९ | | अनंत वासुदेव मराठे<br>सातारा | ,, | ५१ |
| ५० | | विनायक काशिनाथ महाबळेश्वरकर<br>चिंचवड | आश्वलायन<br>गृह्यसूत्र | ५५ |
| ५१ | | चिंतामण प्रल्हाद पंढरपुरे<br>चिंचवड | ,, | ६५ |
| ५२ | | श्रीपाद दामोदर जेरे<br>चिंचवड | ,, | ६३ |
| ५३ | | यशवंत लक्ष्मण तट्टू<br>चिंचवड | ,, | ५१ |

| लेखी गुण १५० | बक्षिसाची रक्कम | बक्षिस कोणाच्या नांवानें व किती |
|---|---|---|
| | ३ | "विद्यार्थी सहाय्यक मंडळाकडून" |
| | २ | |
| | २ | |
| | २ | "प. प. केशवानंद सरस्वती धर्मादाय निधी" |
| | २ | "सभेकडून" |
| | २ | |
| | २ | |

# परिशिष्ट १ लें.

## पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेचा शके १८६७ सालचा जमाखर्चाचा तक्ता.

### जमा

| | |
|---|---|
| ७३०९६- २-११ | शिल्लक सालगुदस्त |
| ७३०५-१५- ७ | जमा साल मजकुरी |
| १४२२- ०- ० | इमारत भाडें खातें |
| १६१३- ४- ० | देणगी (मंत्रजागरसह) |
| ११६- ०- ० | कै. पां. वि. चितळे |
| २१८- ०- ० | बक्षिस खातें |
| ४०९- ८- ० | लग्नमुंज दक्षिणा खातें |
| ४२२- ०- ० | वर्गणी |
| १४२१-१४- ७ | व्याज खातें |
| ८९- ०- ० | हीरक महोत्सव खातें |
| ४४- ०- ० | अनामत खातें |
| १५५०- ५- ० | बट्टाखातें |
| ८०४०२- २- ६ | |

### खर्च

| | |
|---|---|
| ४८९०-१५-११ | सालमजकुरी खर्च |
| ९५४-१३- ६ | इमारतखातें |
| १३४-१०- २ | कमीशनखातें |
| ९७- ७- ० | किरकोळखातें |
| २४८-१०- ० | गुरूजी संभावना |
| १०८- २- ९ | टपालखातें |
| १३९-१०- ० | कै. न. रा. बीडकर |
| ५४५- ०- ० | पगार |
| १३३१- ३- ० | परीक्षा व. समारंभ |
| ३- ०- ० | पुस्तक खरेदी |
| २५८-१४- ० | मुद्रण |
| ४३- ९- ६ | वासंतिक रसपान |
| ४६- ०- ० | विद्वत् संभावना |
| ३५- ०- ० | कै. रा. ब. रंभाजीराव महाडीक |
| ९२४- ०- ० | शिष्यवृत्ती |
| २१- ०- ० | सं. कॉ. दि. ब. गोडबोले |
| ७५५११- २- ७ | शिल्लक पेस्तर सालाबद्दल |
| ८४- ९- ८ | सदाशिव पे. पो. से. बँक |
| २५९१- ९- ५ | पुणें सें. को. ऑ. से. बँक |
| ५१०००- ०- ० | फर्स्ट डे. लोन. ७०-७५ |
| २००००- ०- ० | नॅशनल से. सर्टिफिकीटं |
| ५००- ०- ० | कोशाधिकारी |
| ५०- ०- ० | पुणें सें. को. ऑपरेटिव्ह शेअर |
| १००- ०- ० | किर्लोस्कर ब्रदर्स } द. वि. लिमये |
| १००- ०- ० | ओगले ब्रदर्स } द. वि. लिमये |
| १२५- ०- ० | किर्लोस्कर ब्रदर्स } वामन शास्त्री दातार |
| २५०- ०- ० | मॉडेल मिल्स } शि. म. परांजपे. |
| ५०- ०- ० | ओगले ब्रदर्स } शि. म. परांजपे. |
| २००- ०- ० | न्यू. प्र. मिल्स } शि. म. परांजपे. |
| ४५९-१५- ६ | रोकड शिल्लक |
| ८०४०२- २- ६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कायमनिधि | | ३५१६४-०-० |
| २. | विशिष्ट निधि | | ३९८८६-४-० |
| | फर्स्ट डे लोन ७०-७५ | १५८३६-०-० | |
| | नॅशनल से. सर्टिफिकिटें | २००००-०-० | |
| | कोशाधिकारी | ५००-०-० | |
| | शि. म. परांजपे शेअर्स | ५००-०-० | |
| | वामनशास्त्री दातार | १२५-०-० | |
| | पुणें सें. को. ऑ. बँक शेअर | ५०-०-० | |
| | द. वि. लिमये | २००-०-० | |
| | सदाशिव पो. से. बँक | ८४-४-० | |
| | पुणें सें. को. ऑ. बँक | २५९१-०-० | |
| | | ३९८८६-४-० | |
| ३ | चालू निधि. | | ४६०-१४-७ |
| | पुणें सें. को. ऑ. बँक | ०-९-५ | |
| | सदाशिव पो. से. बँक | ०-५-८ | |
| | रोकड शिल्लक | ४५९-१५-६ | |
| | | | ७५५११-२-७ |

---

## सभेतर्फे शिष्यवृत्त्या घेणारांची यादी.

| | | विषय | इयत्ता | वर्ष | रक्कम | सुरू | अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सखाराम महेश्वर पाध्ये, | वेदपठण | २ | १८६२ | १२० | १८६४ | १८६७ |
| २ | कृष्ण विश्वनाथ बापट | ,, | १ | १८६४ | ६० | ,, | ,, |
| ३ | रंगनाथ श्रीधर जोशी | ,, | १ | १८६३ | ६० | १८६५ | १८६७ |
| ४ | व्यंकटेश लक्ष्मण जोशी, | व्याकरण | १ | १८६५ | ६० | १८६५ | १८६७ |
| ५ | सिताराम जनार्दन आठल्ये, | ज्योतिष | २ | १८६६ | ९६ | १८६६ | १८६७ |
| ६ | गोपाळ पांडुरंग गोरे, | वेदान्त | २ | १८६१ | ९६ | १८६६ | ,, |
| ७ | गोविंद गंगाधर केळकर, | दर्शन | १ | १८६६ | ६० | ,, | ,, |
| ८ | विनायक हरी घैसास, | वेदपठण | २ | ,, | ९६ | ,, | ,, |
| ९ | भालचंद्र गंगाधर फणसलकर | ,, | ,, | १८६५ | ९६ | १८६७ | १८६८ |
| १० | गोपिनाथ गंगाधर केळकर, | व्याकरण | १ | १८६६ | ६० | ,, | ,, |
| ११ | श्रीपाद शंकर दीक्षित तापस, | मीमांसा | १ | १८६७ | ६० | १८६७ | ,, |

# परिशिष्ट २ रें

## परीक्षकांची यादी

१ वे. मू. महादेवभट पुरोहित, मलकापूर
२ ,, ,, सखारामभट यड्डूरकर, नरसोबावाडी
३ ,, ,, बापूशास्त्री समुद्र, पुणें

### विषय ४ याज्ञिक

१ वे. मू. श्रीपाद नागेशभट देवधर, पुणें

### विषय ५ व्याकरण

१ व्याकरणाचार्य रघुनाथशास्त्री काजरेकर, राजापूर
२ ,, महेश्वरशास्त्री जोशी, पुणें

### विषय ६ न्याय

१ वे. शा. सं. विष्णु मोरेश्वर खरे, पुणें
२ न्यायाचार्य पांडुरंगशास्त्री गोस्वामी, सातारा

### विषय ८ अ वेदान्त

१ वे. शा. सं. गोविंद शास्त्री पंढरपुरे, पुणें

### विषय १२ वा दर्शनें

१ वे. शा. सं. विष्णु मोरेश्वर खरे, पुणें
२ न्यायाचार्य पांडुरंगशास्त्री गोस्वामी, सातारा

### विषय १३ सांख्य

१ वे. शा. सं. गोविंदशास्त्री पंढरपुरे, पुणें.
२ व्याकरणाचार्य महेश्वरशास्त्री जोशी, पुणें

### विषय १५ ज्योतिष

१ ज्योतिषालंकार रामचंद्र पांडुरंग मोघे, वसई

### विषय १६ साहित्य

१ का. वे. उप-तीर्थ गणेशशास्त्री भिलवडीकर, पुणें
२ मीमांसाविद्वान् सुब्रह्मण्यशास्त्री पाटणकर, पुणें

### विषय १७ काव्य

१ का. वे. उप–तीर्थ गणेशशास्त्री भिलवडीकर, पुणें
२ मीमांसाविद्वान् सुब्रह्मण्यशास्त्री पाटणकर, पुणें

### विषय १८ वैद्यक

१ आयुर्वेद–महोपाध्याय हरी वासुदेव साने, पुणें

### विषय २२ संगीत

१ आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरी देशपांडे, पुणें
२ श्री. स. आबासाहेब मुजुमदार, पुणें

### नित्यकर्म

१ वे. मू. गणेशभट ठकार, पुणें
२ वे. मू. शिवरामशास्त्री फडके, पुणें

## शके १८६६ सालीं निवडून आलेलें

## अधिकारी मंडळ

**अध्यक्ष**—श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य—मठ, संकेश्वर करवीर.

**उपाध्यक्ष**—( १ ) श्रीमंत पं. सर रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासो पंतसचीव, के. सी. आय. ई. राजेसो भोर. ( २ ) श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासो केळकर, बी. ए. एलएल्.बी. पुणें. ( ३ ) न्यायरत्न नारायण-शास्त्री वाडीकर, अध्यापक सं. कॉलेज अहमदाबाद.

**व्यवस्थापक मंडळाचे सभासद**—( १ ) प्रो. दत्तो वामन पोतदार, बी. ए. ( २ ) श्री. जनार्दन सखाराम उर्फ तात्यासो करंदीकर, बी. ए. एल्एल्. बी. संपादक–केसरी. ( ३ ) श्री. केशव विनायक केळकर एम्. ए. एल्एल्. बी. कार्याध्यक्ष. ( ४ ) वे. मू. परशुराम महादेव गद्रे, अध्यापक वे. पा. शाळा. ( ५ ) काव्यतीर्थ नारायण वासुदेव तुंगार, अध्यापक न्यू. इं. स्कूल ( ६ ) श्री. श्रीपाद बाजी जोग, माजी अ. चीफ ऑफिसर. ( ७ ) श्री. गणेश गोविंद गोरे ( ८ ) श्री. त्र्यंबक गोविंद जोगळेकर, अकाउंटंट मि. फा. डिपार्टमेंट.

**कोशाधिकारी**—श्री. घोंडो कृष्ण साठे, बी. ए. बी. एस्सी.

**कार्यवाह**—( १ ) विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव. ( २ ) श्री. दत्तात्रय गोपाळ फडके, बी. ए. एल्एल्. बी.

**आयव्ययनिरीक्षक**—श्री. जनार्दन महादेव जोशी, रि. स्टँप हेड कारकून.

**परीक्षामंडळ**—( १ ) ज्योतिषाचार्य रघुनाथशास्त्री पटवर्धन. ( २ ) वे. शा. सं. पुरुषोत्तमशास्त्री रानडे. ( ३ ) आयुर्वेदरत्न अनंत यज्ञेश्वर जोशी. ( ४ ) काव्यतीर्थ दत्तात्रय प्रभाकर खाडीलकर. ( ५ ) ह. भ. प. वासुदेव शिवराम कोल्हटकरबुवा.

### सभेचे कारकून

( १ ) शंकर सीताराम हिर्लेकर.

————